बीड । महाराष्ट्र
शनिवार दि. २१ मार्च २०२६
वर्ष ६ वे । अंक १
पान १ । पाने ४
किंमत ३ रूपये

महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955
E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://marathwadapatra.com | https://epaper.marathwadapatra.com

# वर्धापणदिनी मराठवाडा पत्र परिवारावर शुभेच्छांचा वर्षाव...

पाच वर्षापुर्वी आपल्या सर्वांच्या साथीने दै.मराठवाडा पत्र नावाने दैनिक सुरू केले... मागील पाच वर्षात आपण दिलेल्या साथीमुळे गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर वर्धापण दिनाचा कार्यक्रम पार पडला... यावेळी राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, डॉक्टर, वकील, इंजिनिअर अशा समाजाच्या सर्व स्तरातील मान्यवरांनी मराठवाडा पत्र च्या वर्धापण दिन सोहळ्याला उपस्थिती लावली... तुमच्या या प्रेमाने मराठवाडा पत्र परिवार भारावून गेला आहे... या पुढील काळात देखील आम्हाला अगदी हक्काने तुमचे हेच प्रेम, माया आणि आशीर्वादाची गरज आहे.



















## संपादकीय

# महसूल खात्यात महाघोटाळा !

महसूल खात्यातील नियमांचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर झाल्याची कबुली महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधान परिषदेत दिली. आतापर्यंतच्या इतिहासात महसूल खात्यात झालेला हा सर्वांत मोठा घोटाळा आहे. या प्रकरणात जमिनीवरील सातबारा (७/१२) उता-यात शुद्धलेखनातील चुका दुरुस्त करण्याच्या नावाखाली बेकायदेशीर फेरफार करून काही महसूल अधिका-यांनी मालकी हक्कांमध्ये बदल केला, अशी माहिती मंत्री बावनकुळे यांनी दिली. ते म्हणाले, या प्रक्रियेत सुमारे एक ते दीड लाख शेतक-यांना फसवले गेले असून या अनियमिततेमुळे राज्याच्या महसूल खात्याला मोठा फटका बसला आहे. ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी या गंभीर घटनेवर प्रश्न उपस्थित केला. महसूल कायद्यांच्या कलमांचा अधिका-यांकडून चुकीच्या पद्धतीने वापर होतो आणि फेरफार प्रक्रियेत शेतक-यांना अडचण येते. यावर मंत्री बावनकुळे म्हणाले, कलम १५५ चा दुरुपयोग केला गेला असून शुद्धलेखन दुरुस्त करण्याच्या नावाखाली कोट्यवधीच्या निधीचा बेकायदेशीर वापर झाला आहे. प्रवीण घेडा यांच्या अहवालानुसार महसूल खात्यात अनेक अनियमितता झाल्याचे उघडकीस आले आहे. जुलै-ऑगस्ट २०२५ दरम्यान पुणे जिल्ह्यातील काही अधिका-यांनी बेकायदेशीर आदेश पारित करून मालकी हक्क बदलले. यामध्ये मूळ मालकाची संमती नसतानाही सातबारा उता-यात फेरफार करण्यात आले. मंत्र्यांनी सांगितले की, दोषींवर कारवाई होईल आणि पुढील ७ दिवसांत संबंधित अधिका-यांवर कठोर कारवाई केली जाईल. अधिकारी कितीही मोठा असो त्याच्यावरही कारवाई होईल. महसूल खात्यामधील हा सर्वांत मोठा घोटाळा असल्यामुळे आम्ही सर्वत्र तपासाचे आदेश दिले आहेत. आमदार अनिल परब यांनी दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली असून सरकारने दिलेल्या आश्वासनानुसार तहसीलदारांपासून ते वरिष्ठ अधिका-यांपर्यंत संपूर्ण कारवाई होणार आहे. या प्रकरणामुळे महसूल खात्यातील पारदर्शकतेचा प्रश्न पुन्हा एकदा राज्यभर चर्चेचा विषय बनला आहे. जमिनीच्या सातबारा उता-यातच फेरफार करून तब्बल एक ते दीड लाख शेतक-यांची फसवणूक झाल्याची कबुली खुद्द सरकारनेच दिली आहे. महाराष्ट्र जमीन महसूल कायद्यातील कलम १५५ हे मूलत: सातबारा उता-यातील लेखनदोष अथवा शुद्धलेखनातील चुका दुरुस्त करण्यासाठी वापरले जाते. मात्र पुण्यातील काही महसूल अधिका-यांनी याच कलमाचा गैरवापर करत जमिनीच्या हक्कातच परस्पर बदल केले. जुलै-ऑगस्ट २०२५ दरम्यान हा गैरप्रकार उघडकीस आला. शिवसेना ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी हा विषय विधिमंडळात उपस्थित केल्यानंतर विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली. या समितीच्या अहवालात धक्कादायक बाबी समोर आल्या. अनेक प्रकरणांत मूळ मालकाची संमती नसतानाही सातबारामध्ये बदल करण्यात आले. नियमबा पद्धतीने बेकायदेशीर आदेश पारित करून खासगी हितसंबंध जपल्याचेही चौकशीत आढळले. शुद्धलेखन दुरुस्तीच्या नावाखाली सातबारा बदलले गेले, ही अत्यंत गंभीर बाब आहे. महसूल खात्याच्या इतिहासातील हा सर्वांत मोठा घोटाळा असू शकतो. जमिनी बिगरशेती (एनए) करताना आणि मालकी हस्तांतरित करताना मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचे या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. मंत्री बावनकुळे यांनी म्हटले आहे की, मी या खात्याचा मंत्री झालो तेव्हा अनेक तक्रारी माझ्याकडे आल्या. कलम १५५ चा दुरुपयोग झाल्याचे दिसून आले. शुद्धलेखनात झालेली चूक सुधारणे हे काम तहसीलदारांचे आहे. पण 'ध' चा 'मा' करत कोट्यवधीचा शासनाचा निधी वापरण्यात आला. मालकी हक्काचा वापरही केला गेला. विभागीय आयुक्तांनी सादर केलेल्या अहवालात महसूल प्रशासनातील भोंगळ कारभाराचे वाभाडे काढण्यात आले आहेत. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर विरोधकांनी महायुती सरकारवर सडकून टीका केली. काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार यांनीही बावनकुळे यांच्यावर निशाणा साधला. ते म्हणाले, राज्याच्या महसूल मंत्र्यांकडून आलेले वक्तव्य हेच दाखवते की, सर्व विभाग किती दक्ष आहेत आणि अधिकारी कसा फायदा घेत आहेत. लुटारू, बिल्डर्स, डेव्हलपर्स आणि लँड माफिया जशा पद्धतीने महाराष्ट्रातील जनतेला लुटत आहेत तशाच पद्धतीने अधिका-यांनीही लुटायचे काम केले आहे. बावनकुळे यांच्या वक्तव्यावरून हेच सिद्ध होते की, खात्यातील अधिकारी त्यांच्या पदाचा दुरुपयोग करत आहेत, कारण त्यांना कोणाचाच धाक राहिला नाही. सत्ताधारी, मंत्री आणि आमदार हेच जर त्या अधिका-याकडून उलट-सुलट काम करून घेत असतील, चुकीची कामं करून घेत असतील, तर त्या अधिका-यांनी या लोकांची कामं करताना स्वत:ची दहा कामं करून प्रचंड माया जमा करण्याचे काम केले आहे हेच सिद्ध होते. पुण्यात झालेल्या तपासणीमध्ये ३८ हजार २७ घोटाळ्यांची प्रकरणे उघड झाली आहेत. यामध्ये महसूल विभागातील २४७ अधिकारी दोषी असल्याचे बावनकुळे यांनी म्हटले आहे. पुण्यातील हे प्रकरण पाहता संपूर्ण राज्यात आतापर्यंतचा हा सर्वांत मोठा घोटाळा असावा. संपूर्ण राज्यात अशा प्रकरणांची तपासणी करून पुढील अधिवेशनाआधी पूर्ण माहिती जाहीर करण्यात येणार आहे. धनिकांनी महसूल अधिका-यांना हाताशी धरून गोरगरिबांच्या केलेल्या या फसवणुकीमुळे या कुटुंबावर आत्महत्येची वेळ आल्याचे आमदार अनिल परब म्हणाले. दोषी अधिका-यांना निलंबित करा अशी मागणीही त्यांनी केली. या घोटाळ्यांची चौकशी करण्यासाठी आता परराज्यातील लोकांचा समावेश असणारी 'एसआयटी' नेमावी लागेल, असा टोलाही त्यांनी लगावला. राज्यात गत शतकभरात जमिनीच्या मालकी हक्काचे स्वरूप पूर्णपणे बदलले असून, १९३० च्या तुलनेत आज राज्यातील सातबारा उतारे आणि जमिनीच्या नकाशांची संख्या जवळपास तीन पटींनी वाढली आहे. वारसा हक्काने होणारी वाटणी, जमिनीची खरेदी-विक्री आणि वाढते शहरीकरण यामुळे सातबारा उता-यावर नवीन पोटहिस्से तयार होऊन नकाशे आणि सातबारा उतारे यांचा आकडा आता १ कोटी ६२ लाखांच्या घरात पोहोचला आहे. राज्यात १८९० ते १९३० या काळात पहिली भूमापन प्रक्रिया झाली होती. त्यावेळी ५० लाख २१ हजार इतके जमिनीचे नकाशे आणि तेवढेच सातबारा उतारे तयार झाले होते.

# वर्धापणदिनी मराठवाडा पत्र परिवारावर शुभेच्छांचा वर्षाव...















## आ.संदीप क्षीरसागर अवकाळीने झालेल्या

# नुकसानीच्या पाहणीसाठी थेट बांधावर



**बीड ।** प्रतिनिधी

जिल्ह्यात अनेक ठिकाणी मागील दोन दिवसांपासून गारांसह अवकाळी पाऊस पडत आहे. यामुळे काढणीला आलेल्या गहू, ज्वारी सह इतर पिकांचे आणि फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे आ. संदीप क्षीरसागर यांनी शुक्रवारी (दि.२०) रोजी प्रशासनाला घेऊन प्रत्यक्ष बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली आणि प्रशासनाला पंचनामे करण्याचे निर्देश दिले. तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वस्त केले. वेधशाळेने मागील काही दिवसांपूर्वीच अवकाळी पाऊस व गारपीटीचा अंदाज वर्तवला होता. त्या अंदाजानुसार मागील दोन दिवसांपासून बीड जिल्ह्यात अनेक भागांमध्ये अवकाळी पाऊस आणि गारपीट सुरू आहे. यानंतर गुरुवारी (दि. १९) दुपारी बीड तालुक्यातील लिंबागणेश, पिंपळनेर परिसरासह बीड मतदारसंघातील वेगवेगळ्या भागात जोरदार पाऊस झाला. या पाऊस आणि गारपीटीने हाताशी आलेले गहू, ज्वारी, हरभरा यासह रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच अंबा, टरबूज, खरबूज, चिकू आदी फळबांगाचे मोठे नुकसान झाले आहे. मोठ्या प्रमाणात गारपीट झाल्याने लिंबागणेश (ता. बीड) येथील शेतकरी दादासाहेब खिल्लारे यांचा टरबूजाचा पूर्ण प्लॉटचे नुकसान झाले आहे. गारपीटीने मार लागून काही फळे फुटली तर अनेक फळे मार लागून खराब झाली आहेत. असेच नुकसान अनेक ठिकाणी टरबूज आणि खरबूज लागवड केलेल्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. या नुक्सानीची माहिती मिळताच आ. संदीप क्षीरसागर यांनी आज शुक्रवारी (दि.२०) सकाळीच धाव घेत चक्क बांधावर जाऊन आ. संदीप क्षीरसागर यांनी लिंबागणेश, पोखरी, पिंपरनई येथे भेट देऊन नुकसानीची पाहणी केली. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा दिला तसेच या नुकसानीचे पंचनामे करुन घेऊन शासनाकडून भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले आहे. यावेळी राजेंद्र मस्के, तहसीलदार चंद्रकांत शेळके व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.




Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक मराठवाडा पत्र



# कनकालेश्वर महोत्सव ही बीडची खरी ओळख-त्रिदशकपूर्ती उत्सवात डॉ.योगेश क्षीरसागर यांचे प्रतिपादन

## संस्कार भारतीच्या तिसाव्या कंकालेश्वर महोत्सवाने नववर्षाचे स्वागत

**बीड । प्रतिनिधी**

गेली तीन दशके बीड जिल्ह्याची सांस्कृतिक ओळख सर्वदूर करणारा कनकालेश्वर महोत्सव ही बीडची खरी ओळख असून मोठे कलावंत देखील आम्ही या महोत्सवात कला सादर केल्याचे अभिमानाने सांगतात, आता हा महोत्सव अधिक व्यापक व्हावा असे प्रतिपादन युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.



तीसावा कनकालेश्वर महोत्सव प्रतिवर्षाप्रमाणे कनकालेश्वर मंदिराच्या परिसरात आणि जलाशयातील तरंगत्या रंगमंचावर संपन्न झाला. या महोत्सवाचे उद्धाटन भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, भाजप युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर, संस्कार भारती देवगिरी प्रांताचे उपाध्यक्ष देवेंद्र कुलकर्णी यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले. त्यानंतर सौ वासवदत्ता हसेगावकर आणि प्रमोद वझे यांनी संस्कार भारती गीत सादर केले.तबल्यावर सार्थक वझे तर संवादीनी वर महेश वाघमारे यांनी साथ दिली कार्यक्रमास यावेळी ज्येष्ठ नेते नवनाथ शिराळे संरक्षक भरत लोळगे, रंगकर्मी कुलदीप धुमाळे प्रसिद्धी प्रमुख महेश वाघमारे, गटनेत्या डॉ. सारिका क्षीरसागर नगरसेवक आदित्य माने नगरसेवक शुभम धूत, नगरसेवक गोविंद शिराळे शांतिनाथ डोरले यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश तालखेडकर यांनी केले तर प्रास्ताविक आणि आभार प्रांतमंत्री प्रमोद वझे मानले.

हा महोत्सव यशस्वी होण्यासाठी जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत सौन्दतिकर, संतोष पारगावकर, डॉ.रवि शिवणीकर, अशोक कुलकर्णी, अनंत सुतनासे, अनिल कुलकर्णी, सुरेश साळुंके गुरु कुलकर्णी, रुक्मिणीकांत पांडव, लक्ष्मीकांत रुईकर, महेश देशमुख, लक्ष्मीकांत खडकीकर, सुजित देशमुख, गणेश स्वामी, श्रीपाद देशमुख सुरभी खोपटीकर, स्नेहा पारगावकर, प्रज्ञा वझे, आशा भारती, सोनल पाटील यांनी परिश्रम घेतले.

## दिंद्रुडचा अजिंक्य अमोल ठोंबरे नवोदय पुर्वपात्र परीक्षेत जिल्ह्यात चौथा



**दिंद्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल बालासाहेब ठोंबरे यांचा चिरंजीव अजिंक्य हा नवोदयच्या इयत्ता ६ वी पुर्वपात्र परीक्षेत पात्र झाला आहे. त्याने बीड जिल्ह्यात चौथा क्रमांक मिळवून गावचे व शाळेचे नाव उज्वल केले आहे. नवोदयच्या पुढील शिक्षणासाठी तो पात्र ठरला असून अजिंक्यचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

जिल्ह्यात पात्र झालेल्या ८० विद्यार्थ्यांपैकी दिंद्रुड येथील सर्वाधिक १२ विद्यार्थी नवोदयासाठी पात्र झाले आहेत. दिंद्रुड येथील चार शाळेचे एकुण १२ विद्यार्थी नवोदय परीक्षेत उत्तीर्ण होत गढी येथील पीएम श्री नवोदय विद्यालयात पुढील शिक्षणासाठी पात्र ठरले आहेत. यामध्ये पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे यांचे सुपुत्र अजिंक्य ठोंबरे याने नवोदय परीक्षेत भरघोस यश मिळवून मोठे यश संपादन केले आहे. त्याने जिल्ह्यात चौथा क्रमांक पटकावला आहे. अजिंक्यने आतापर्यंत मंथन सामान्य ज्ञान परीक्षेत सलग दोन वर्षे माजलगाव तालुक्यातून प्रथम येण्याचा बहुमान मिळवलेला आहे. दिंद्रुड परिसरातील विद्यार्थी या परीक्षेत घवघवीत यश मिळवून नवोदय प्रवेशासाठी पात्र झाले आहेत. येथील खोलेश्वर विद्यालयाचे अजिंक्य अमोल ठोंबरे, राजवीर बप्पासाहेब डावकर, आदित्य सतीश धुमाळ, गोविंद विष्णू शेळके, वेदांत प्रफुल सलगरे,कु. मनवा ज्ञानेश्वर वाव्हळ, शौर्य रामभाऊ वाघ, स्वप्नील लहुदास कांबळे, आर्यन शंकर मेंडके हे ९ विद्यार्थी तर व्यंकटेश पब्लिक स्कूल ची शरयु बाळु कोल्हापूरे, चंद्रभागा पोदार शाळेचा उज्ज्वल गिते तसेच इतर शाळेतील श्रेयांश छत्रभुज घोडके असे एकूण १२ विद्यार्थी यावर्षी नवोदय विद्यालयात प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत. या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे दिंद्रुड येथील विविध शाळा, बाजारपेठ, विविध संस्था व व्यापाऱ्यांनी यथोचित सन्मान करत पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



**दैनिक मराठवाडा पत्र च्या ५व्या वर्धापन दिनानिमित्त संपादक दत्तात्रेय नरनाळे साहेबांना शुभेच्छा देताना भाजपा जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख भाजपा जिल्हा सरचिटणीस नवनाथ अण्णा शिराळे मराठवाडा पत्र माजलगाव तालुका प्रतिनिधी संतोष रासवे व मित्र**

### जाहीर प्रगटन

**DISTRICT CONSUMER DISPUTES REDRESSAL COMMSSION BEED**

**Under the Consumer Protection Act, 2019**

**CONSUMER CASE NO. DC/470/CC/701/2025**

**Petitioner / Appellant - SAYYED SAHAJANBI YASIN S/o. SAHAJANBI YASIN**

**Versus**

**Opposite Party / Respondent Name: - DHUNAKESHWAR MULTIPAL NIDHI Through its PRESIDENT SHRI. SHIVHARI ASHOK YADAV**

**To. Opposite Party / Respondent(s)**

1. SHRI. DHUNAKESHWAR MULTIPAL NIDHI THROUGH ITS PRESIDENT SHRI. SHIVHARI ASHOK YADAV. R/O. DHUNAKWAD NO.1 TQ. DHARUR., MAHARASHTRA. BEED-413601. 2. SHRI. SHIVHARI ASHOK YADAV THROUGH ITS PRESIDENT SHRI. DHUNAKESHWAR MULTIPAL NIDHI. R/O. DHUNAKWAD NO.1 TQ. DHARUR., MAHARASHTRA BEED-413601. 3. SACHIN PANDURANG RODGE VICE PRESIDENT SHRI. DHUNAKESHWAR MULTIPAL NIDHI.LTD. DINDRUD. BEHIND GRAMIN POLICE STATION, KESAPURI CAMP. MAJALGAON, TQ. MAJALGAON., MAHARASHTRA BEED-431131. 4. DNYANESHWAR SUDAM YADAV BRANCH MANAGER SHRI. DHUNAKESHWAR MULTIPAL NIDHI. LTD. DINDRUD. R/O. SHIVAJI CHOWK, DINDRUD, TO. MAJALGAON., MAHARASHTRA BEED-431128. 5. PANDURANG SUDAM TANDALE SECRETARY SHRI. DHUNAKESHWAR MULTIPAL NIDHI LTD. DINDRUD. R/O. SHIVAJI NAGAR, MAJALGAON, TQ. MAJALGAON, MAHARASHTRA BEED-431131

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक २२/०४/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक- १०/०३/२०२६

ठिकाण - बीड

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**प्रबंधक जिल्हा ग्राहक तक्रार, निवारण आयोग, बीड.**

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४६१ / २०२६**

अर्जदार- **(१) बिभीषण पि. श्रीधर बडगे, वय ५६ वर्षे, धंदा शेती, रा. बेलखंडी पाटोदा ता. जि. बीड. (२) चंद्रसेन पि. श्रीधर बडगे, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. बेलखंडी पाटोदा ता. जि. बीड. (३) आशाबाई भ्र. अर्जुन मुंढे, वय ६६ वर्षे, धंदा घरकाम, रा. पाचंग्री, ता. पाटोदा, जि. बीड. (४) चांदणी भ्र. बंडु पवार, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम, रा. रसाळ नगर, खर्डा, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर,** विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

अर्जदार हे भारतीय आहेत

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे श्रीधर त्रिंबक बडगे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे **श्रीधर त्रिंबक बडगे, रा. बेलखंडी पाटोदा ता. जि. बीड हे दिनांक २८/०९/२०२५ रोजी मौजे बेलखंडी पाटोदा ता. जि. बीड** येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ व २ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क. ३ व ४ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयताची पत्नी पद्यमीणबाई भ्र श्रीधर बडगे ही दि. ३०/०९/२०२४ राजी मयत झाली आहे मयताचे आई वडील फार पुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कात त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पुढील दिनांक २२/०४ / २०२६**

आज दिनांक १८/०३/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**(ॲड. उबाळे एस. एस.)**

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**क. लिपीक**

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्तर बीड**

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४१२ / २०२६**

अर्जदार - **१) शांताबाई भ्र. मुकूंद जायगुडे, वय-८३ वर्षे, धंदा घरकाम, रा. शाहुनगर, बीड ता. जि. बीड. (२) चंद्रकांत पि. मुकुंदराव जायगुडे, वय ५९ वर्षे धंदा-नौकरी, रा. एस. न.२०७सी. टी. एस. १४४९ तानिया अपार्टमेंट बी २०५ कस्पटे वस्ती, वाकड जि. पुणे. (३) कल्याण पि. मुकूंदराव जायगुडे, वय ५० वर्षे, धंदा-नौकरी, रा. शाहुनगर, बीड ता. जि. बीड. (४) संगिता भ्र. बाळाभाऊ पिंपळे, वय-५६ वर्षे, धंदा घरकाम, रा. गणेश नगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड. ५) सुनिता भ्र. बबन तांबे, वय ५३ वर्षे, धंदा घरकाम, रा. एमआयडीसी, ए. पी. एम. कॉलनी, मुकुंदवाडी औरंगाबाद. (६) सविता भ्र. भास्कर धस, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. तळणेवाडी, ता. गेवराई, जि. बीड.** विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

अर्जदार हे भारतीय आहेत

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नाम मुकुंद माधवराव जायगुडे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

**मयत नाम मुकुंद माधवराव जायगुडे, रा. शाहुनगर, बीड, ता. जि. बीड हे दिनांक ०८/११/२०२५ रोजी शाहुनगर, ता. जि. बीड** येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून, अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क. ४ ते ६ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कात त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्यादुद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक १८/०३/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**पुढील दिनांक २०/०४/२०२६**

**(ॲड. भालेराव टी. बी.)**

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**क. लिपीक**

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व . स्तर बीड**

# ईद : बंधुभाव, त्याग आणि मानवतेचा पवित्र संदेश

भारत हा विविध धर्म , संस्कृती आणि परंपरांचा संगम असलेला देश आहे . या विविधतेमध्ये एकात्मतेचा धागा घट्ट बांधून ठेवणारे सण म्हणजे भारतीय समाजाचे खरे सौंदर्य होय . प्रत्येक सण हा केवळ धार्मिक विधीपुरता मर्यादित नसून तो सामाजिक सलोखा , बंधुभाव आणि मानवतेचा संदेश देणारा असतो . इस्लाम धर्मातील सर्वात महत्त्वाचा आणि आनंदोत्सव म्हणून साजरा केला जाणारा सण म्हणजे ईद .

ईद-उल-फितर के पावन अवसर पर आप सभी को हार्दिक शुभकामनाएं ।

यह पवित्र पर्व आपके जीवन में खुशियां , शांति और समृद्धि लेकर आए ।

आपसी प्रेम , भाईचारा और सद्भावना का यह संदेश समाज में सदैव बना रहे ।

ईद मुबारक !

ईद या शब्दाचा अर्थच आनंद , उत्सव आणि समाधान असा होतो . रमजान या पवित्र महिन्यानंतर साजरी होणारी ईद-उल-फितर ही संयम , त्याग आणि ईश्वरभक्तीच्या साधनेनंतर येणारी आनंदाची पहाट आहे . त्यामुळे हा सण केवळ उत्सव नसून तो आत्मशुद्धी आणि कृतज्ञतेचे प्रतीक मानला जातो . रमजान महिन्याचे महत्त्व मोठे आहे . या महिन्यात मुस्लिम बांधव सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत रोजा म्हणजे उपवास करतात . हा उपवास केवळ अन्नत्याग नसून मन , वाणी आणि कृती यांवर नियंत्रण ठेवण्याची साधना आहे . या काळात वाईट विचारांपासून दूर राहणे , गरजू लोकांना मदत करणे , नमाज अदा करणे आणि अल्लाहची उपासना करणे याला विशेष महत्त्व दिले जाते .



रोजा पाळताना उपाशी राहणाऱ्या गरीबांची जाणीव होते आणि समाजातील दुर्बल घटकांप्रती सहानुभूती निर्माण होते . त्यामुळे रमजान हा केवळ धार्मिक विधी नसून सामाजिक संवेदनशीलता वाढवणारा काळ आहे . या पवित्र साधनेनंतर जेव्हा रमजानचा चंद्र मावळतो आणि नवीन चंद्राचे दर्शन होते , तेव्हा ईदचा आनंद साजरा केला जातो . चंद्रदर्शनाची ही परंपरा अत्यंत भावनिक आणि आनंददायी असते . गावोगावी , शहरोगावी चंद्र दिसल्याची बातमी पसरताच वातावरणात उत्साह संचारतो .

ईदच्या दिवशी सकाळी लवकर उठून स्नान करून स्वच्छ किंवा नवीन कपडे परिधान केले जातात . पुरुष पारंपरिक पोशाखात मशिदीत किंवा ईदगाहमध्ये नमाज अदा करतात . नमाजानंतर सर्वजण एकमेकांना ईद मुबारक म्हणत मिठी मारतात . ही मिठी केवळ शुभेच्छा नसून मनातील कटुता दूर करून नव्याने नातेसंबंध जोडण्याचा संदेश असतो .

ईदचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे दानधर्म . इस्लाम धर्मात जकात आणि फिटरा यांना विशेष महत्त्व आहे . जकात म्हणजे आपल्या संपत्तीतील काही भाग गरीबांना देणे , तर फिटरा म्हणजे ईदपूर्वी दिले जाणारे दान . यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीला सणाचा आनंद मिळतो . कोणीही उपाशी किंवा वंचित राहू नये , हा या परंपरेमागील मुख्य उद्देश आहे . ईद सणामध्ये खाद्यसंस्कृतीलाही विशेष स्थान आहे .

शीरखुर्मा हा गोड पदार्थ ईदची खास ओळख आहे . त्यासोबत सेवई , बिर्याणी , कबाब , मिठाई असे विविध पदार्थ तयार केले जातात . घराघरात पाहुण्यांचे स्वागत केले जाते . नातेवाईक , मित्र , शेजारी यांना आमंत्रित करून प्रेमाने जेवण दिले जाते .

ग्रामीण भागात ईद सण अधिक साधेपणाने पण मनापासून साजरा केला जातो . गावातील मशिदीत नमाज अदा केल्यानंतर सर्वजण एकत्र येतात . विविध धर्मीय लोक एकमेकांच्या घरी जाऊन शुभेच्छा देतात . या परंपरेमुळे सामाजिक ऐक्य अधिक दृढ होते . ईद हा सण आपल्याला समानतेचा संदेश देतो . या दिवशी श्रीमंत-गरीब , मोठा-लहान असा कोणताही भेदभाव केला जात नाही . सर्वजण एकाच रांगेत उभे राहून नमाज अदा करतात . त्यामुळे समाजात समानतेची भावना दृढ होते. आधुनिक काळात ईद साजरी करण्याच्या पद्धतीत काही बदल झाले असले तरी त्यामागील मूल्ये कायम आहेत . मोबाईल , सोशल मीडिया यांच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या जातात . तरीही प्रत्यक्ष भेटून आनंद वाटण्याची परंपरा आजही जपली जाते . ईद हा सण आपल्याला शिकवतो की जीवनात संयम , त्याग आणि सहकार्य या मूल्यांचे महत्त्व काय आहे . जर समाजात परस्पर प्रेम आणि आदर असेल तरच खरी प्रगती साध्य होऊ शकते .

आजच्या काळात समाजात वाढत चाललेल्या तणाव , भेदभाव आणि गैरसमज यांच्या पार्श्वभूमीवर ईदचा संदेश अधिक महत्त्वाचा ठरतो . हा सण आपल्याला सांगतो की धर्म वेगळे असले तरी मानवता एकच आहे . ईदचा आनंद हा केवळ एका समाजापुरता मर्यादित नसून तो संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे . प्रेम , सहकार्य आणि समानतेच्या भावनेतूनच समाज अधिक मजबूत होतो .

ईद-उल-फितरच्या पवित्र निमित्ताने सर्व मुस्लिम बांधवांना मनःपूर्वक शुभेच्छा देताना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले की , ईद हा सण आपल्याला बंधुभाव , संयम आणि समाजातील दुर्बल घटकांप्रती संवेदनशीलता यांचा संदेश देतो . रमजान महिन्यातील साधना ही प्रत्येकाला आत्मपरीक्षणाची संधी देते आणि समाजात सकारात्मकता निर्माण करते . त्यांनी पुढे नमूद केले की , सण हे समाजातील ऐक्य वाढविण्याचे माध्यम आहेत . सर्व धर्मीय नागरिकांनी एकमेकांच्या सणांमध्ये सहभागी होऊन सामाजिक सलोखा अधिक दृढ करावा . प्रशासनाच्या वतीने सर्व नागरिकांच्या सुख , शांती आणि समृद्धीसाठी सदैव प्रयत्न केले जातील

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की - सजग मन , प्रेमळ विचार आणि एकतेची भावना यांच्यामुळेच समाज सशक्त बनतो . या ईदच्या निमित्ताने सर्वांच्या जीवनात आनंद , आरोग्य आणि समाधान नांदो , हीच मनापासून सदिच्छा .

**- चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार, बीड**

**अवसायक (Liquidator)**
**श्री साईराम अर्बन मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटी लि.बीड तथा उपनिबंधक, सहकारी संस्था ता.बीड**
**Email Id- liquidatorsairammultistate@gmail.com**

जा.क्र. /अवसायक/साईराम मल्टीस्टेट/ मूल्यांकन /2026 — दि. 20/03/ 2026

श्री साईराम अर्बन मल्टिस्टेट को ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी लि.बीड (अवसायनात ) या संस्थेच्या विविध शाखांमध्ये असलेल्या डेड स्टॉक मालमत्तेचे (लाकडी फर्निचर ,इलेक्ट्रिक व इलेक्ट्रॉनिक साहित्य,तिजोरी,स्ट्रॉंग रूम व इतर साहित्य )मूल्यांकन करून त्याचा अंदाजे बाजारभाव निश्चित करण्यासाठी अनुभवी मूल्यांकनकार (व्हॅल्युअर )यांच्याकडून खालील अटींवर अर्ज/कोटेशन मागमागविण्यात येत आहेत.

अटी व शर्ती

१) अर्जदार हा शासन किंवा वित्तीय संस्था यांचेकडील मान्यताप्राप्त मूल्यांकनकार असावा

२) संबंधित क्षेत्रातील किमान अनुभव असावा

३)अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावीत

नोंदणी प्रमाणपत्र

पॅन/जीएसटी (असल्यास)

४)मूल्यांकनासाठी अपेक्षित शुल्क(फीस)स्पष्ट नमूद करावे

५)निवड करण्याचा अंतिम अधिकार अवसायक यांचेकडे राहील

इच्छुक मूल्यांकनकारानी आपले अर्ज /कोटेशन दिनांक 29/03/2026 पर्यंत खालील पत्त्यावर पाठवावेत

पत्ता

अवसायक, श्री साईराम अर्बन मल्टि स्टेट को ऑप क्रेडिट सोसायटी लि.बीड तथा उपनिबंधक सहकारी संस्था तालुका बीड.सहकार शक्ती इमारत,तिसरा मजला,जालना रोड बीड .४३११२२

(एस.बी.घोडके)
अवसायक
श्री साईराम अर्बन मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटी लि.बीड तथा उपनिबंधक, सहकारी संस्था ता.बीड

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शनिवार दि. २१ मार्च २०२६ ●






शुभेच्छा देतांना जिल्हा माहिती अधिकारी प्रशांतजी दैठणकर साहेब, माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार बाळासाहेब आजबे, पांडुरंग नागरगोजे, संदीप लवांडे आदी छाया चित्रात दिसत आहेत.

## डॉक्टर गायब, रुग्ण बेहाल! गंगामसला उपकेंद्रातील बेफिकीरीचा कळस; ग्रामस्थ संतोष रासवे यांची चौकशीची मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील गंगामसला येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात सुरू असलेल्या डॉक्टरांच्या अनुपस्थितीमुळे नागरिकांचे हाल होत असून, आरोग्य यंत्रणेच्या निष्काळजीपणाचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. उपकेंद्रात कार्यरत असलेले डॉ. वाघमारे हे नियुक्त ठिकाणी राहत नसल्याचा आणि नियमितपणे सेवेत हजर राहत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. आरोग्य सुविधा नागरिकांच्या दारात पोहोचवण्यासाठी शासनाने उभारलेली उपकेंद्रेच आता निष्प्रभ ठरत असल्याचे चित्र येथे दिसत आहे. उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना डॉक्टरच उपलब्ध नसल्याने निराश होऊन परत जावे लागत आहे. अनेकांना इतर गावांमध्ये जाऊन उपचार घ्यावे लागत असून, यात वेळ आणि पैशांचा मोठा अपव्यय होत आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि गर्भवती महिलांची अवस्था विशेषतः बिकट झाली आहे. वेळेवर उपचार न मिळाल्यास गंभीर परिणाम होण्याची शक्यता असून, यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाचा उद्रेक होत आहे. उपकेंद्र आहे, पण डॉक्टर नाहीत; मग या सुविधेचा उपयोग काय? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांसह संतोष रासवे यांनी आरोग्य विभागाकडे जोरदार मागणी केली आहे की, या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच संबंधित डॉक्टरांनी नियमितपणे हजर राहून सेवा द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. गंगामसला येथील ही परिस्थिती आरोग्य यंत्रणेतील ढिसाळ कारभार उघड करत असून, आता तरी वरिष्ठ अधिकारी जागे होणार का, असा प्रश्न संतप्त नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.


































